# चिपळूण नगर परिषद, चिपळूण.
# तपशिलवार निवीदा सुचना

चिपळूण नगर परिषद हद्दीमधील बाजारपेठ भागातील वाशिष्ठी नदीवर दुपदरी पुल बांधणे कामी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टन्सी (P.M.C.) नियुक्त करावयाची आहे. या कामी या क्षेत्रामधील अनुभवी, मान्यताप्राप्त आणि नोंदणीकृत व्यक्ती आणि संस्थांकडून बी-वन पध्दतीने **ठोक दर पध्दतीने** सिलबंद निवीदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कॉन्टीजन्सी सोडून एस्टीमेट रक्कम | बयाणा रक्कम डि.डि/मुदत ठेव पावतीने | काम पुर्ण करण्याची मुदत | निवीदा फॉर्म फि |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंतरराष्ट्रीय मानांकनांनुसार नियोजीत पुलाचे आराखडे, तपशिलवार अंदाजपत्रके, रेखाचित्रे वगैरे तयार करणे. | सुमारे ५.०० कोटी | २५०००.०० | ३ महीने | ५०००.०० |
| २ | तयार केलेल्या आराखडे, अंदाजपत्रके, रेखाचित्रे यांना सक्षम प्राधिकरणाची तांत्रीक मान्यता आणि प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन देणे. | -- | | १५ दिवस | |
| ३ | निवीदा फॉर्म तयार करणे, अटी व शर्ती तयार करणे. | -- | | १५ दिवस | |
| ४ | प्राप्त निवीदांची छाननी करुन अहवाल सादर करणे. | -- | | १५ दिवस | |
| ५ | नगर पालिकेने कामाचे आदेश दिले नंतर कामावर दैनंदिन सुपरव्हीजन करणे, नगर परिषदेस दैनंदिन अहवाल सादर करणे. | -- | | १५ दिवस | |
| | योजनेचा आर्थीक व भौतीक बारचार्ट तयार करणे, बारचार्ट नुसार प्रत्येक आठवडयाचे अखेर आढावा घेणे आणि प्रगती अहवाल नगर परिषदेस सादर करणे. | -- | | १५ दिवस | |
| | प्रकल्पाचे त्रयस्थ लेखा परिक्षण करुन घेऊन अहवाल सादर करणे. | -- | | १५ दिवस | |
| | प्रकल्पासाठी वापरणेत येणारे सर्व साहीत्याचे मान्यताप्राप्त सक्षम प्राधिकरणाकडून टेस्ट रिपोर्ट सादर करणे. | -- | | १५ दिवस | |
| | बाजारपुलाचे आराखडे तयार करणे पासून पुलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत करावी लागणारी सर्व अनुषंगीक कामे करणे. | -- | | १५ दिवस | |

१. निवीदा फॉर्म दिनांक ०२ /०२ /२०११ पर्यंत म्यु.पल रेकॉर्ड विभागात सायं. ४.०० पर्यंत मिळतील.

२. निवीदा पूर्व बैठक दिनांक ०३ /०२ /२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता

३. निवीदा फॉर्म स्विकारणेची अंतीम तारीख दिनांक ०४ / ०२ /२०११ दुपारी २.०० वाजेपर्यंत पर्यंत प्रशासकिय अधिकारी, चिपळूण नगर परिषद यांचे कक्षात ठेवलेल्या निवीदा पेटीमध्ये निवीदा आणून टाकावयाची आहेत.

४. निवीदा उघडणेची वेळ दिनांक ०४ /०२/२०११ रोजी सायंकाळी ४.०० वाजता.

**<u>अटी व शर्ती -</u>**

१. निवीदा धारक संस्थेची किमान आर्थीक उलाढाल अंदाजपत्रकीय रकमेच्या दुप्पट असली पाहिजे.

२. निवीदा धारक हे कौन्सील ऑफ आर्कीटेक्टशी संलग्न असले पाहिजेत.

३. अर्जासोबत कंपनी प्रोफाईल जोडणे आवश्यक आहे.

४. पुलांचे उभारणी करणेचे कामांचे बाबत प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी म्हणून काम करणेचा अनुभव असणे आवश्यक आहे.

५. मंजुर निवीदा धारक यांना करतेवेळी १.५० टक्के सुरक्षा अनामत रोखीने भरावयाची आहे. तसेच बिलातून नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत व अन्य शासकीय कर कापून घेणेत येतील.

६. आलेली एक अगर सर्व निवीदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मुख्याधिकारी, चिपळूण नगर परिषद यांजकडे राखून ठेवलेला आहे.

७. वरील कामांविषयी अधिक माहिती नगर पालिका कार्यालयातील बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

**लखोटा क्रमांक १ मध्ये ठेवावयाचे कागदपत्र**

१. बयाणा रक्कमेचे डि.डि./एक वर्ष मुदत ठेव पावती व कामाचे अनुभवाचे दाखले ठेवावेत.

२. अनुभवाचे दाखले

३. कंपनी प्रोफाईल

४. संस्था नोदणी प्रमाणपत्र

५. आयकर नोंदणी प्रमाणपत्र

**लखोटा क्र.२ मध्ये ठेवावयाचे कागदपत्र**

लखोटा क्रमांक २ मध्ये करपात्र दरपत्रक निवीदा फॉर्म ठेवावा. लखोटा क्र. १व २ लाखेने सिलबंद करुन लखोटा क्र. ३ मध्ये ठेवुन सिलबंद करावयाचा आहे. कागदपत्र अपूर्ण असल्यास व लखोटा लाखेने सिलबंद नसल्यास दरपत्रकाचा लखोटा उघडण्यात येणार नाही.

निविदा क्र.

| | |
|---|---|
| **(गणेश शेटे)** | **(अजमल पटेल)** |
| **मुख्याधिकारी** | **अध्यक्ष** |
| **चिपळूण नगर परिषद** | **चिपळूण नगर परिषद** |